DAY — **10** SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	24	1100	**J-327**	(M)

AGRICULTURE SCIENCE AND TECHNOLOGY (75)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 70**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक तेथे सुबक व नामनिर्देशित आकृत्या काढा.

(३) उजवीकडे दाखविलेले अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(४) सर्व प्रश्नांच्या उत्तरांचा प्रारंभ नवीन पृष्ठांवर करावा.

प्र. १. **(अ)** खालील दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडा आणि खालील विधाने पूर्ण करा : **[१८]** (५)

(१) अळिंबी हे ------ चा प्रमुख स्रोत आहे.

(अ) स्निग्ध घटक (ब) कार्बोदके

(क) प्रथिने (ड) खनिजे

(२) ज्वारीवरील ------ या किडीच्या नियंत्रणासाठी क्षेत्रीय (zonal sowing) पेरणीची शिफारस केलेली आहे.

(अ) तुडतुडे (Jassids) (ब) मीजमाशी (Midge fly)

(क) शेंडेमाशी (Shoot fly) (ड) मावा (Aphids)

(३) लैंगिक फलनाशिवाय बियांची निर्मिती होण्यास ------ असे म्हणतात.

(अ) अगंतूक (Adventive embroyny) गर्भवाढ

(ब) अगंतूक जनन (Apogamy)

(क) अबिजुक जनन (Apospory)

(ड) अगंतूक प्रजनन (Apomixis)

(४) कृषी पर्यटन म्हणजे ------ .

(अ) शेतीमध्ये राहणे

(ब) शेतातील उपक्रमात सहभाग घेणे

(क) शेती उत्पादने खरेदी करणे

(ड) वरील सर्व

(५) ----- ही केळीची एक जात आहे.

(अ) को-७२१९ (ब) हरिसाल

(क) क्रिकेट बॉल (ड) रत्ना

(ब) जोड्या लावा : (४)

'अ' गट	'ब' गट
(अ) हवामान	(१) टोमॅटो
(ब) सोयाबीन	(२) साग रोपे
(क) भाजीपाला रोपवाटिका	(३) भौतिक घटक
(ड) काचगृह	(४) *ग्लायसीन मॅक्स* (*Glycine max*)
	(५) काच
	(६) *ओरायझा सटायव्हा* (*Oryza Sativa*)

(क) खालील विसंगत पर्याय ओळखा : (४)

(१) डोळे भरणे / कलम बांधणे / छाट कलम/ बियाणे

(२) विशाल / वरलक्ष्मी / सावित्री / गोदावरी

(३) ए.टी.आय.सी (ATIC) / संगणक / लॅपटॉप / भ्रमणध्वनी (cellphone)

(४) सोडिअम बेन्झोएट / ऑसिटीक ॲसीड / सायट्रीक ॲसीड / गवार डिंक (Guar gum)

(ड) खालील विधाने 'बरोबर' किंवा 'चूक' ते लिहा : (५)

(१) कांदापिकाची रोपे कायमस्वरूपी रोपवाटिकेत वाढविली जातात.

(२) हुरडा पार्टी हा एक उपक्रम आणि मनोरंजनात्मक कृषीपर्यटनाचा प्रकार आहे.

(३) सर्वसाधारण बाजारपेठेमध्ये फक्त एक किंवा दोन वस्तूंची देवाणघेवाण केली जाते.

(४) ट्रॅक्टर चालक हा एक कुशल कामगार आहे.

(५) शीत कटिबंधीय देशामध्ये जाळीची हरितगृहे (Shadenet houses) लोकप्रिय आहेत.

प्र. २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही पाच) : **[१०]**

(१) टीप लिहा– 'स्वच्छता' (Asepsis)

(२) कृत्रिम शाकीय अभिवृद्धीच्या प्रकाराची सूची तयार करा.

(३) भ्रमणध्वनीचे (Cellphone) उपयोग लिहा.

(४) फळांचा जाम तयार करण्याच्या प्रक्रियेचा आकृतीबंध (Flow chart) द्या.

(५) टीप लिहा– भेसळ निर्मूलन (Roguing)

(६) आंबा पिकाचे उपयोग लिहा.

(७) सोयाबीन बियाण्याच्या संपूर्ण स्वच्छता प्रक्रियाक्रमाचा आकृतीबंध (Flow chart) काढा.

प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१२]**

(१) सेंद्रिय शेतीचे फायदे लिहा.

(२) शेती व्यवस्थापकाची कार्ये लिहा.

(३) सोयाबीन पिकाविषयी खालील मुद्द्यांवर माहिती लिहा.

(i) मूळस्थान

(ii) जमीन

(iii) जाती (कोणत्याही दोन)

(४) ऊस पिकामधील आंतरमशागतीच्या विविध कामांची सूची तयार करा आणि ऊस बांधणी (Earthing up) विषयी सविस्तर लिहा.

(५) संगणक आणि इंटरनेटचे (Internet) कृषी क्षेत्रामधील उपयोग लिहा.

(६) हरितगृह तंत्रज्ञानास असणारी वाव लिहा.

(७) सेंद्रिय शेतीचे उद्देश (Aims) लिहा.

प्र. ४. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही चार) : **[१६]**

(१) अळिंबीचे महत्त्व लिहा.

(२) कृषी–पर्यटनाचे फायदे लिहा.

(३) अफलित जनन ची (parthenogenesis) व्याख्या द्या आणि त्याची कारणे लिहा.

(४) स्थानानुसार कृषी बाजारपेठेचे वर्णन करा (On the basis of location)

(५) बियाणे प्रक्रियेचे महत्त्व लिहा.

(६) रोपवाटिकेचे फायदे लिहा.

प्र. ५. **(अ)** खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा (कोणतेही एक) : (६) **[१४]**

(१) केळी पिकाविषयी खालील मुद्द्यांना अनुसरून माहिती द्या.

(i) जमीन (ii) हवामान

(iii) लागवडीचे अंतर (iv) हेक्टरी उत्पन्न

(v) उपयोग

(२) शेती व्यवस्थापकाची व्याख्या द्या आणि त्यांचे गुण लिहा.

(ब) खालीलपैकी प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा (कोणतेही एक): (८)

(१) 'गहू' पिकाविषयी खालील मुद्द्यांवर माहिती लिहा :

(i) वनस्पतिशास्त्रीय नाव व कूळ

(ii) जमीन व हवामान

(iii) उपयोग

(iv) कापणी (काढणी) व हेक्टरी उत्पन्न

(२) कापसाच्या संकरित - 4 (H-4) जातीच्या संकरित बीजोत्पादना विषयी खालील मुद्द्यांवर माहिती लिहा :

(i) वाण – (अ) मादीवाण

(ब) नरवाण

(ii) बियाणे प्रमाण (हेक्टरी) – (अ) मादीवाण

(ब) नरवाण

(iii) विलगीकरण अंतर व लागवड ओळींचे प्रमाण

(iv) निर्बीजीकरण

◆◆◆